प्रजावाणी दि 30/03/2023

# घरफोडीच्या तयारीत असलेल्या चोरट्यांना उस्माननगर पोलिसांकडून अटक

## २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



मारतळा, (वार्ताहर) दि. २९ : उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या गोळेगाव, ता. लोहा शिवारात एका ओमिनी व्हॅनच्या आडोशाला अंधारात थांबुन घरफोडीच्या तयारीत असलेल्या चोरट्यांना गस्तीवरील पोलीस पथकाने झडप घालून तिघांना पकडले. मात्र अंधाराचा फायदा घेऊन एक जण पळून जाण्यात यशस्वी झाला. पकडलेल्या दोघां चोरट्यांकडून दोन लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात चोरलेल्या दोन बकऱ्या, कुलूप तोडण्यासाठीची टॉमी, एक चाकू सापडला आहे. त्यांच्याकडून घरफोडी व जबरी चोरीच्या घटनेचा छडा लागणार आहे. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात तीन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या हळदा-मारतळा मार्गावरील गोळेगाव, ता. लोहा टी पॉईंट परिसरात दि. २८ मार्चच्या पहाटे एका ओमिनी व्हॅनच्या आडोशाला अंधारात ३ चोरटे घरफोडीच्या व वाटमारीच्या उद्देशाने दबा धरून बसले होते. त्याचवेळी रात्रीच्या गस्तीवर असलेले सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती यांच्या पथकाच्या निदर्शनास हे चोरटे आले. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता त्यांनी आपली पोलीस गाडी थांबवली व अतिशय चपळाईने दबा धरून बसलेल्या चोरट्यांवर झडप घातली. यात राजू भरत सोळंके (वय १९ वर्षे, रा. कुरूळा, ता. कंधार), अनिल गोविंद सोळंके (वय २२ वर्षे, रा. शेलगाव, ता. लोहा) यांना दोघांना पकडण्यात पोलिसांना यश आले.

तर तिसरा आरोपी वामन माधव गरसोळे (रा. पेठशिवनी, ता.कंधार) हा मात्र अंधाराचा फायदा घेत पोलिसांच्या झटापटीत पळून जाण्यात यशस्वी झाला. त्याचा शोध पोलीस घेत आहेत. या चोरट्यांसोबत दोन चोरलेल्या बकऱ्या होत्या तर हे तिघेजण ओमिनी व्हॅनने प्रवास करत चोरीच्या उद्देशाने येथे दबा धरून बसले होते. त्यांच्याकडून एक ओमिनी व्हॅन, कुलूप तोडण्यासाठी वापरली जाणारी टॉमी, चाकू असा २ लाख ६० हजारांचा मुद्देमाल उस्माननगर पोलीस पथकाने जप्त केला. या आरोपींकडून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.



गुरुवार दि. ३० रोजीच्या रामनवमीच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाने नांदेड शहरात बुधवारी (दि.२९) रोजी पथसंचलन केले.